दावा दाखल तारीख - १०/०३/२०२६
दावा फैलावर तारीख - १०/०३/२०२६
नियमित दिवाणी दावा ३१/२०२६ दावा निकाल तारीख - १८/०३/२०२६

# तडजोड हुकुमनामा

रे.क.नं.३१/२०२६
नि-११/अ

## मे.दिवाणी न्यायाधिशसो क.स्तर,पन्हाळा

यांचे कोर्टात...........

| | |
|---|---|
| **१. शंकर नारायण चव्हाण**<br>व.व.५३,धंदा-शेती,<br>रा.माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर<br>**२. मारुती नारायण चव्हाण**<br>व.व.७१,धंदा-शेती,रा.सदर<br>**३. तानाजी नारायण चव्हाण**<br>व.व.६२,धंदा-शेती,रा.सदर | वादी |

**विरुद्ध**

| | |
|---|---|
| **१. शालिनी उर्फ शालाबाई नारायण चव्हाण**<br>व.व.७५,धंदा-घरकाम,<br>रा.माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर<br>**२. यशोदा वसंत पाटील**<br>व.व.५५,धंदा-घरकाम,रा.सदर | प्र.वादी |

**हिंदु वारसा कायदा कलम ६ व ८ प्रमाणे.दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटणीचा, तुटक कब्जा व कायम मनाईसाठी.**
**कोर्ट फि साठी रु.१६४.००/-**
**Hindu Succession Act Sec-6 & 8**

**<u>यातील वादींचे नम्रपणे कळविणे की,</u>**

**१) <u>दावा मिळकतीचे वर्णन</u> :-**

मौजे माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील गट नं.१६९६/ब एकुण क्षेत्र ०२ हे. ०२.०० आर,आकार रु.०४.१० पैसेची मिळकत.

**यांसी चतु:सिमा :-**

**पुर्वेस :-** गणपती बाळु पाटील वगैरे यांची मिळकत.

**पश्चिमेस :-** सरकारी रस्ता.

**दक्षिणेस :-** शिवाजी ज्ञानू पाटील यांची मिळकत.

**उत्तरेस :-** दत्तात्रय गणपती सणगर यांची मिळकत.

येणेप्रमाणे वर्णनाची शेत मिळकत व त्यामध्ये असणारी सामाईकत विहीर मधील पाणी उपसण्याचा असणारा हक्क तसेच वादी यांचा कायदेशीर हिंदु वारसा हक्काने येणार हिस्सा हा दाव्याचा विषय असुन त्यास येथुन पुढे "सदर मिळकत" असे संबोधणेत आलेले आहे.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत वादी व प्र.वादी यांचे दरम्यानची वंशावळ पुढीलप्रमाणे :-

**नारायण चव्हाण (म.वा.)**

| शालिनी उर्फ शालाबाई **(पत्नी)** | मारुती **(मुलगा)** | शंकर **(मुलगा)** | तानाजी **(मुलगा)** | यशोदा **(मुलगी)** |
|---|---|---|---|---|

येणेप्रमाणे वादी व प्र.वादी यांची वंशावळ असे.

३)	वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत वादी व प्र.वादी यांचे पुर्वहक्कदार नारायण चव्हाण यांची वाडवडिलार्जित मालकी हक्काची व एकत्र कुटुंबाची मिळकत होती व आहे. यातील वादी,प्र.वादी यांचे पुर्व हक्कदार हे दि.२४/०४/२०११ इ.रोजी मयत झालेनंतर त्यांचे मृत्युपश्चात वर नमुद केले दावा मिळकती मध्ये प्र.वादी नं.१ यांचे नावाची नोंद वर नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद आहे. त्यापासून वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये यातील वादी व प्र.वादी यांची समाईकमध्ये कब्जे व वहिवाट आहे. तसेच यातील वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान अदयापही सरस सरस-निरस मानाने कधीही तुटक असे वाटप झालेले नव्हते व नाही.

४)	यातील प्र.वादी नं.१ यांच्या एकट्याच्या नावाची नोंद वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरती ७/१२ पत्रकी मालक सदरी नोंद आहे.तथापी यातील वादी यांचा वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे हिस्सा आहे.तसेच सदर दावा मिळकतीमध्ये वादी व प्र.वादी यांची आजतागायत सामाईकात कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे वादी यांनी दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप करणेबाबत प्र.वादी नं.१ यांना वेळोवेळी विचारणा केली असता यातील प्र.वादी यांनी उडवाउडवीची उत्तरे देवुन दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप करुन देणेस स्पष्टपणे नकार दिला आहे.

५)	दावा मिळकतीमध्ये प्रस्तुत वादी यांचा प्रत्येकी १/५हिस्सा असुन तो बेकायदेशीरपणे डावलणेच्या हेतुने दावा मिळकतीचे प्रस्तुत वादी,प्र.वादी यांचेमध्ये आजतागायत सरस-निरस मानाने तुटक असे वाटप झालेले नसताना

दावा मिळकती हया वादीचे अपरोक्ष अन्य त्रयस्थ इसमांना तबदिल,हस्तांतरण व विक्री करणेचा खटाटोप प्र.वादी यांनी चालविलेला आहे.सदर प्र.वादी यांचे कृत्य हे बेकायदेशीर, अप्रामाणिकपणाचे तसेच दावा मिळकतीमधील वादीचा असणारा कायदेशीर हिस्सा डावलणारे असे आहे.

६) सदर मिळकतीमध्ये वादी यांचा हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे प्रत्येकी १/५ हिस्सा असुन यातील वादी यांचे पुर्वहक्कदार यांच्या मृत्युनंतर वादी व प्र.वादी यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत आजतागायत सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही.दावा मिळकतीमध्ये वादी व प्र.वादी यांची सामाईक कब्जेवहिवाट होती व आहे.

७) यातील वादी यांनी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता व तुटक कब्जा मिळणेकरीता ता.१०/०१/२०२६ इ.रोजी प्र.वादी यांचेकडे मागणी केली असता प्र.वादी यांनी वादीना सदर मिळकतीचे वाटप "आज करु उद्या करु" असे सांगुन चालढकल करु लागले आहेत.

८) तदनंतर वादी यांनी वारंवार प्र.वादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप करुन मागितले असता प्र.वादी यांनी वादी यांना दावा मिळकतीशी "तुझा काही संबंध नाही,सदर मिळकतीवरती आमच्या नावाची नोंद आहे सदर दावा मिळकत त्रयस्त पक्षकार यांना विक्री करणार आहे.तुला काय करायचे ते कर" असे सांगितले. सदर प्र.वादी यांचे कृत्य संपुर्णत: बेकायदेशीरपणाचे, अनाधिकाराचे नैसर्गिक न्यायतत्वा विरुद्ध व हिंदु वारसा कायदयातील तरतुदीविरुद्धचे असे आहे.

९) वास्तविक यातील वादी यांचा दावा मिळकतीमध्ये हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे प्रत्येकी १/५ हिस्सा होता व आहे. यातील वादी व प्र.वादी यांच्यामध्ये कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांच्या वाटपाला येणाऱ्या हिस्सेचे सरस-निरस मानाने तुटक वाटप व त्याचा पृथक कब्जा वादी व प्र.वादी यांना मिळालेला नाही.वादींनी प्र.वादी यांचेकडे दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने तुटक वाटप करुन देणेची मागणी करुन देखील प्र.वादी यांनी वादींना कायदेशीर हिस्सा देणेस टाळाटाळ केलेली होती व आहे.सदर प्रमाणे वादी यांचा सदर मिळकतीमधील कायदेशीर हिस्सा टाळाटाळ करणेचा प्रस्तुत प्र.वादी यांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही.

१०) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना वादीनी पुन्हा ता.२३/०२/२०२६ इ. रोजी मध्ये प्र.वादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस निरसमानाने वाटप होवुन मिळणेसाठी मागणी केली असता प्र.वादी यांनी वादींना त्यांचा असणारा कायदेशीर हिस्सा देणेचे स्पष्ट शब्दात नाकारले व वादी यांचा दावा मिळकतीमध्ये असलेला कायदेशीर अविभक्त प्रत्येकी १/५ हिस्सा बेकायदेशीरपणे गिळंकृत /हडप करणेच्या उद्देशाने प्र.वादी यांनी संगनमताने दावा मिळकती त्रयस्थ इसमांना विक्री करणेचा प्रयत्न चालवला आहे.त्यामुळे वादी यांना सदरचा वाटपाचा दावा दाखल करणेस भाग पडले आहे.

## ११) <u>दावेस कारण</u> :-

वादी यांनी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता व तुटक कब्जा मिळणेकरीता ता.१०/०१/२०२६ इ.रोजी प्र.वादी यांचेकडे मागणी केली असता प्र.वादी यांनी वादीना सदर मिळकतीचे वाटप “आज करु

उद्या करु" असे सांगुन चालढकल करु लागले आहेत तेव्हा व तदनंतर वादीनी पुन्हा ता.२३/०२/२०२६ इ.रोजी मध्ये प्र.वादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस निरसमानाने वाटप होवुन मिळणेसाठी मागणी केली असता प्र.वादी यांनी वादींना त्यांचा असणारा कायदेशीर हिस्सा देणेचे स्पष्ट शब्दात नाकारले वेळोवेळी प्रस्तुत दावेस कारण घडले व घडत आहे.

**१२) दावेचा तपशिल व आकारणी :-**

**रक्कम रु.**

| | |
|---|---|
| **१६४.००/-** | दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचा एकुण आकार०४.१० रुपये होत असुन त्याचे ८० पट आकारणी ३२८/- कोर्ट फि साठी व २०० पट किंमत ८२०/- अधिकारासाठी केलेली असुन वादीचे १/५ हिस्सेची किंमत आकारणी सदरी दाखल. |
| **रु.१६४.००/-** | **एकुण रक्कम** |

**१३) दावेची आकारणी :-**

कोर्ट फिसाठी या दावेची आकारणी रु.१६४.००/- पैसे केली असुन त्यावर महाराष्ट्र कोर्ट फि कायदा १९५९ मधील कलम ६ (iv)(vi)(j) आर्टीकल २३(f) प्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे.

१४) यातील वादी,प्र.वादी व दावा मिळकती ह्या या मे.कोर्टाच्या स्थलसिमेत येत असलेने सदरचा दावा मे.कोर्टात चालवणेचा या मे.कोर्टास पुर्ण हक्क व अधिकार आहे.

१५) प्रस्तुत दावा मुदतीत आहे.यातील वादी व प्र.वादी यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत या व अन्य कोणत्याही मे.कोर्टात वाद प्रलंबित नाही.तसेच दावा मिळकती संदर्भात प्र.वादी यांचेकडुन वादींना कॅव्हेटची नोटीस नाही.

**१६) <u>सबब,वादीची विनंती की,</u>**

अ. वादीचा दावा मंजुर करणेत यावा.

ब. दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप होवुन वादींचा प्रत्येकी १/५ अगर कायदयाने येणारा हिस्सा तुटक असा होवुन त्याचा पृथक कब्जा वादींना देवविणेबाबत आदेश होवुन मिळावा व तसा ठराव व हुकूमनामा व्हावा.

क. दावा मिळकत ही शेतजमीन असलेने तिचे मे.जिल्हाधिकारीसो यांचे मार्फत वाटप करणेबाबत आदेश व्हावा.

ड. सदर दावेचा वादीचा कोर्ट खर्च प्र.वादी यांचेकडुन वसुल होवुन मिळावा.

इ. जरुर तर दावा दुरुस्तीस परवानगी व संधी असावी.

आज दि.१४/०३/२०२६ इ.रोजी राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मा.श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामी,पॅनेल प्रमुख तथा दिवाणी न्यायाधिशसो,क.स्तर पन्हाळा यांचेसमोर तसेच वादी व तर्फे वकील डी.एम.पाटील व प्र.वादी व तर्फे वकील ए.बी.पाटील यांचे समक्ष नि.९ वरील तडजोड पुरसीस नुसार सदरचा दावा तडजोडीने अंतिम निकालात निघाला.

**<u>यातील वादी व प्र.वादी यांची तडजोड पुरसीस पुढीलप्रमाणे :-</u>**

१) यातील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्र.वादी विरुद्ध दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे.

२) **<u>दावा मिळकतीचे वर्णन</u> :-**

मौजे माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील गट नं.१६९६/ब एकुण क्षेत्र ०२ हे. ०२.०० आर,आकार रु.०४.१० पैसेची मिळकत.

**यांसी चतु:सिमा :-**

**पुर्वेस :-** गणपती बाळु पाटील वगैरे यांची मिळकत.

**पश्चिमेस :-** सरकारी रस्ता.

**दक्षिणेस :-** शिवाजी ज्ञानू पाटील यांची मिळकत.

**उत्तरेस :-** दत्तात्रय गणपती सणगर यांची मिळकत.

तथापी वर नमुद दावा मिळकतीचे अनुषंगाने यातील वादी व प्र.वादी यांचेमध्ये राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ता.१४/०३/२०२६ इ.रोजी कोर्टामध्ये आपआपसात तडजोड झालेली असुन वाटपा संबंधी असणारा वाद पुर्णपणे मिटला आहे. त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

३) वर कलम २ मध्ये नमुद केलेली मिळकत वादी व प्र.वादी यांचे पुर्वहक्कदार नारायण चव्हाण यांची वाडवडिलार्जित मालकी हक्काची व एकत्र कुटुंबाची मिळकत होती व आहे. यातील वादी,प्र.वादी यांचे पुर्व हक्कदार हे दि.२४/०४/२०११ इ.रोजी मयत झालेनंतर त्यांचे मृत्युपश्चात वर नमुद केले दावा मिळकती मध्ये प्र.वादी नं.१ यांचे नावाची नोंद वर नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद आहे. त्यापासून वर कलम २ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये यातील वादी व प्र.वादी यांची समाईकमध्ये कब्जे व वहिवाट आहे. तसेच यातील वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान अदयापही सरस सरस-निरस मानाने कधीही तुटक असे वाटप झालेले नव्हते व नाही.

४) तथापी यातील प्र.वादी नं.१ शालिनी उर्फ शालाबाई नारायण चव्हाण यांची वर कलम २ मध्ये नमुद केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी एकट्याचे नावाची नोंद झालेली आहे.तथापी आजरोजी यातील वादी व प्र.वादी यांचेमध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे प्र.वादी नं.१ शालिनी उर्फ शालाबाई नारायण चव्हाण यांनी वर कलम २ दावा मिळकती मधील त्यांचे हिस्सेस असणारे क्षेत्र वादी नं.१ शंकर नारायण चव्हाण, वादी नं.२ मारुती नारायण चव्हाण व वादी नं.३ तानाजी नारायण चव्हाण यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे.तसेच प्र.वादी नं.२ यशोदा वसंत पाटील यांनी त्यांचा हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांचा हिस्सा कायमपणे वादी यांना सोडुन दिलेला आहे. त्याबाबत यातील वादी, प्र.वादी यांचेमध्ये कोणताही वाद अस्तित्वात राहिलेला नाही. तसेच सदर गोष्टीबाबत यातील प्र.वादी यांची कोणतीही हरकत अगर तक्रार नाही. त्याबाबत सदर प्र.वादी यांची मुक्त संमत्ती आहे. त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार अथवा हरकत नाही.

५) यातील वादी व प्र.वादी यांचेमध्ये आजरोजी आपआपसात तडजोड झालेली असुन त्यातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-

६) **वादी नं.१ शंकर नारायण चव्हाण यांचे हिस्सेत येणारे क्षेत्र पुढीलप्रमाणे.**

**अ.** मौजे माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील गट नं.१६९६/ब एकुण क्षेत्र ०२ हे. ०२.०० आर,आकार रु.०४.१० पैसेची मिळकत पैकी वादी नं.१ यांचे हिस्सेस येणारे क्षेत्र ०० हे.६६.३४ आर यांसी चतु:सिमा :-

**पुर्वेस :-** आबु गणु पाटील वगैरे यांची मिळकत.

**पश्चिमेस :-** गावठाण रस्ता.

**दक्षिणेस :-** तानाजी नारायण चव्हाण यांची याच गटातील मिळकत.

**उत्तरेस :-** दत्तात्रय गणपती सणगर यांची मिळकत.

येणेप्रमाणे वर नमुद केलेल्या चतु:सिमेतील मिळकत यातील वादी नं.१ शंकर नारायण चव्हाण यांना सदर तडजोड पुरसीसीने देणेत आलेली आहे.तसेच यातील प्र.वादी नं.२ यशोदा वसंत पाटील यांनी हिंदु वारसा कायदयातील तरतुदी प्रमाणे त्यांचा येणारा हिस्सा वादी नं.१ शंकर नारायण चव्हाण यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे.त्याबाबत वादी नं.२ व ३ व प्र.वादी नं.१ ते २ यांची कोणतीही तक्रार अथवा हरहरकत नाही. त्यांनी या तडजोड पुरसीस आधारे वरीलप्रमाणे मिळकतीच्या ७/१२ पत्रकी मे.तलाठीसो व मे.मंडळ अधिकारीसो अथवा संबंधीत शासकीय तसेच निमशासकीय ऑफिसमधुन आपआपल्या नावाची वर नमुद केलेप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद करुन घेणेची आहे. तसेच तडजोडी नुसार मे.मंडळ अधिकारीसो,व मे.तलाठीसो, यांनी वादी यांच्या नावाची नोंद करुन घेणेची आहे.

**ब. वादी नं.२ मारुती नारायण चव्हाण यांचे हिस्सेत येणारे क्षेत्र पुढीलप्रमाणे**

मौजे माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील गट नं.१६९६/ब एकुण क्षेत्र ०२ हे. ०२.०० आर,आकार रु.०४.१० पैसेची मिळकत पैकी वादी नं.२ यांचे हिस्सेस येणारे क्षेत्र ०० हे.६७.२० आर यांसी चतु:सिमा :-

**पुर्वेस :-** गणपती बापु पाटील वगैरे यांची मिळकत.

**पश्चिमेस :-** देवस्थानची मिळकत.

**दक्षिणेस :-** शिवाजी ज्ञानू पाटील यांची मिळकत.

**उत्तरेस :-** तानाजी नारायण चव्हाण यांची मिळकत.

येणेप्रमाणे वर नमुद केलेल्या चतु:सिमेतील मिळकत यातील वादी नं.२ मारुती नारायण चव्हाण यांना सदर तडजोड पुरसीसीने देणेत आलेली आहे. तसेच यातील प्र.वादी नं.२ यशोदा वसंत पाटील यांनी हिंदु वारसा कायदयातील तरतुदी प्रमाणे त्यांचा येणारा हिस्सा वादी नं.२ मारुती नारायण चव्हाण यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे.त्याबाबत वादी नं.१ व ३ व प्र.वादी नं.१ ते २ यांची कोणतीही तक्रार अथवा हरहरकत नाही. त्यांनी या तडजोड पुरसीस आधारे वरीलप्रमाणे मिळकतीच्या ७/१२ पत्रकी मे.तलाठीसो व मे.मंडळ अधिकारीसो अथवा संबंधीत शासकीय तसेच निमशासकीय ऑफिसमधुन आपआपल्या नावाची वर नमुद केलेप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद करुन घेणेची आहे. तसेच तडजोडी नुसार मे.मंडळ अधिकारीसो,व मे.तलाठीसो, यांनी वादी यांच्या नावाची नोंद करुन घेणेची आहे.

**क. वादी नं.३ तानाजी नारायण चव्हाण यांचे हिस्सेत येणारे क्षेत्र पुढीलप्रमाणे.**

मौजे माले,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील गट नं.१६९६/ब एकुण क्षेत्र ०२ हे. ०२.०० आर,आकार रु.०४.१० पैसेची मिळकत पैकी वादी नं.३ यांचे हिस्सेस येणारे क्षेत्र ०० हे.६५.३४ आर यांसी चतु:सिमा :-

**पुर्वेस :-** एकनाथ गणपती पाटील वगैरे यांची मिळकत.

**पश्चिमेस :-** देवस्थान.

**दक्षिणेस :-** मारुती नारायण चव्हाण यांची याच गटातील मिळकत.

**उत्तरेस :-** शंकर नारायण चव्हाण यांची याच गटातील मिळकत.

येणेप्रमाणे वर नमुद केलेल्या चतु:सिमेतील मिळकत यातील वादी नं.३ तानाजी नारायण चव्हाण यांना सदर तडजोड पुरसीसीने देणेत आलेली आहे. तसेच यातील प्र.वादी नं.२ यशोदा वसंत पाटील यांनी हिंदु वारसा कायदयातील तरतुदी प्रमाणे त्यांचा येणारा हिस्सा वादी नं.३ तानाजी नारायण चव्हाण यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे.त्याबाबत वादी नं.१ व २ व प्र.वादी नं.१ ते २ यांची कोणतीही तक्रार अथवा हरहरकत नाही. त्यांनी या तडजोड पुरसीस आधारे वरीलप्रमाणे मिळकतीच्या ७/१२ पत्रकी मे.तलाठीसो व मे.मंडळ अधिकारीसो अथवा संबंधीत शासकीय तसेच निमशासकीय ऑफिसमधुन आपआपल्या नावाची वर नमुद केलेप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद करुन घेणेची आहे. तसेच तडजोडी नुसार मे.मंडळ अधिकारीसो,व मे.तलाठीसो, यांनी वादी यांच्या नावाची नोंद करुन घेणेची आहे.

७) वर कलम २ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये असणारी विहीर व उर्वरीत ४ गुंठे क्षेत्र वादी नं.१ ते ३ यांचेमध्ये समाईकात ठेवणेत आलेली आहे.त्याप्रमाणे विहीरीतील पाणी उपसणेचा हक्क यातील वादी नं.१ ते ३ यांना समप्रमाणात दिलेला आहे. त्याप्रमाणे वादी नं.१ ते ३ यांनी पाळीपत्रक नेमुण त्याप्रमाणे विहीरीतील पाणी उपसणेचे आहे. त्याबाबत यातील वादी नं.१ ते ३ यांनी कोणतीही तक्रार अथवा हर हरकत करणेची नाही.

८) वर कलम २ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत झालेल्या तडजोडीनुसार यातील वादी नं.१ ते ३ यांनी एकमेकास कब्जे वहिवाटीस हरकत अथवा हर हरकत करणेची नाही. तसेच वर नमुद केलेल्या तडजोडीनुसार वाटणीस आलेल्या क्षेत्रामध्ये असणाऱ्या घर मिळकतीबाबत अथवा त्यांचे कब्जे बाबत

यातील वादी नं.१ ते ३ यांनी हरकत व अडथळा करणेचा नाही.याबाबत वादी नं.१ ते ३ यांची कोणतीही हरकत अथवा तक्रार नाही. त्यास त्यांची मुक्तपणे संमत्ती आहे.

९) सदरप्रमाणे नाव नोंद करणेस उभयंतांची हकरत अगर तक्रार नाही.भविष्यात कोणीही,कोणत्याही प्रकारची एकमेकांस हरकत अगर अडथळा,तक्रार करणेची नाही.प्रस्तुत मिळकतीमध्ये उभयंतांची एकमेकांचे हिस्सेत येथुनपुढे काही संबंध हक्क,दावा,वाद,चार्ज,पोटगी व अग्रहक्क वगैरे सर्व कायदेशीर बाबी राहिलेल्या नाहीत.भविष्यात एकमेकांचे वारसांची एकमेकांच्या हक्कात कोणतीही हरकत अगर तक्रार असणार नाही.हे उभयंताना मान्य व कबुल आहे.

१०) वर नमुद केलेप्रमाणे ज्याचे-त्याचे हिस्सेने यातील वादी व प्र.वादी यांनी निरंतर कायमस्वरुपी मालकी हक्काने सदर मिळकत उपभोगणेची आहे.अथवा गरज पडलेस तबदीलीच्या मार्गाने तबदील करणेची आहे.तसेच ज्याचे-त्याचे हिस्सेप्रमाणे गरज पडलेस वित्तीय संस्थेचा कर्जबोजा निर्माण करणेस उभयंतांची हरकत अगर तक्रार असणार नाही.

११) ज्याचे-त्याचे हिस्सेस येणे-जाणेकरीता रस्ता आहे.त्याबाबत उभयंताचा वाद नाही.भविष्यात रत्याबाबत उभयंतानी वाद निर्माण करणेचा नाही.तसेच तडजोड पुरसीसी सोबत हात नकाशा जोडलेला आहे.तो याचा एक भाग आहे.


१२) सदरची तडजोड पुरसीस वादी व प्र.वादी यांचेमध्ये आपसात झालेली आहे. सदरची पुरसीस वादी व प्र.वादी यांचेवर व त्यांचे वाली वारस यांचेवर लागु व बंधनकारक आहे.

१३) सदर दाव्याचा खर्च ज्याचा-त्याचा-ज्याचा-त्याने सोसणेचा आहे.

**मौजे . माले**

तालुका . पन्हाळा

जिल्हा . कोल्हापूर




स्केल १ ः १000

# खर्चाचा आकडा

नियमीत दिवाणी दावा नं. ३१/२०२६ मधील नि.११/अ सोबत

| अ.नं. | तपशिल | वादी | प्रतिवादी क्र.१ ते २ |
|---|---|---|---|
| १ | दावा अर्जास मुद्रांक | २०० | -- |
| २ | वकील पत्रास मुद्रांक | १० | १० |
| ३ | वकील फी | १५० | १५० |
| ४ | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | १५ | -- |
| ५ | आदेशिका लागू करणेस मुद्रांक | -- | -- |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ७ | मनाई अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ८ | कमिशनरची फी | -- | -- |
| ९ | साक्षीदारास भत्ता | -- | -- |
| १० | इतर अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| | एकूण ... | ३७५ | १६० |
| | वजा न दिलेला खर्च | | |
| १ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| २ | कोर्ट फी परतावा | २०० | -- |
| | एकूण ..... | १७५ | १६० |

आज दिनांक १४ माहे मार्च सन २०२६ इसवी रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

14/3/26

( एस.व्ही.जंगमस्वामी.)
पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोकन्यायालय ,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर पन्हाळा

क. लिपिक

वादी तर्फे वकील – दिपक महादेव पाटील

प्रतिवादी तर्फे वकिल – ए.बी.पाटील

<u>टीप - या वादातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र ठरतील)</u>